# जिल्हा परिषद नाशिक आरोग्य विभाग
## पदभरती शुध्दीपत्रक

जिल्हा परिषद नाशिकच्या विविध पदभरती करिता जाहिरात क्रं. 01/2019 दिनांक 03/03/2019 रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिराती मधील विविध पदापैकी आरोग्य विभागाच्या 5 पदाच्या भरतीस शासनाने मान्यता दिली. शासन मार्गदर्शनानुसार माहे मार्च, 2019 च्या जाहिराती मधील काही पदे कमी झाली, काही पदांमध्ये वाढ झाली. त्यामुळे माहे मार्च, 2019 च्या जाहिरातीतील पदांच्या अनुषंगाने विवरणपत्र "अ" जाहिर प्रकटन व कमी झालेली पदे, वाढलेली दिव्यांगाची व खुल्यातील सुधारीत पदाकरिता पात्र उमेदवाराकडून अर्ज प्राप्त करुन घेण्याकरिता पदभरती जाहिरात दिनांक 26 ऑगस्ट 2021 रोजी दैनिक सामना व दैनिक नवभारत या वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन सविस्तर जाहिरात व जाहिरप्रकटणाचे विवरणपत्र-"अ" व विवरणपत्र-"ब" 1. www.zpnashik.maharashtra.gov.in 2. www.nrhm.maharashtra.gov.com 3. http://arogya.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर दिनांक 26 ऑगस्ट 2021 रोजी प्रसिध्द करण्यात आले होते.

1. महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन शुध्दीपत्रक क्रं. संकीर्ण-2020/प्र.क्र.99/आस्था-8 दि. 01 सप्टेंबर 2021 नुसार प्रसिध्द केलेले शुध्दीपत्रक व समक्रमांकाचे पत्रानुसार दिलेल्या सुचनेनुसार नाशिक जिल्हा परिषदने दिनांक 26/08/2021 रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिर प्रकटन विवरणपत्र –"अ" मधील मुद्दा क्रं. 05 व जाहिरात क्रं. 01/2021 दिनांक 25/08/2021 मधील मुद्द क्रं. 19 खालील प्रमाणे नमुद केलेला आहे.

"माहे मार्च, 2019 च्या जाहीरातीनुसार ऑनलाईन परिक्षेकरिता उमेदवारांना एक किंवा एकापेक्ष जास्त जिल्हा परिषदांसाठी अर्ज करण्याची मुभा होती. तथापि, आता शासनाचे महापरिक्षा पोर्टल रद्द झाल्याने सदरची आरोग्य विभागाशी संबंधीत पदभरती ही OMR Vendor मार्फत Offline पध्दतीने राबविण्यात येणार असल्याने उपरोक्त 5 संवर्गातील प्रत्येक संवर्गाची परिक्षा राज्यात सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवाराला एकाच जिल्हा परिषदेमधून परीक्षा देता येईल. यासाठी ज्या उमेदवारांनी एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमध्ये रिक्त पदांकरिता अर्ज सादर केले आहेत. अशा उमेदवारांनी परिक्षेकरिता एकाच जिल्हा परिषदेचा विकल्प वरिलप्रमाणे नमूद संकेतस्थळावर दिनांक 01 सप्टेंबर, 2021 ते 14 सप्टेंबर,2021 या कालावधीपर्यंत नोंदविणे आवश्यक राहिल".

याऐवजी

"माहे मार्च, 2019 च्या जाहिरातीनुसार ऑनलाईन परिक्षेकरिता उमेदवारांना एक किंवा एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमधील एक किंवा अधिक संवर्गातील पदांसाठी अर्ज करण्याची मुभा होती. तथापि, आता शासनाचे महापरिक्षा पोर्टल रद्द झाल्याने सदरची आरोग्य विभागाशी संबंधीत पदभरती ही OMR Vendor मार्फत Offline पध्दतीने राबविण्यात येणार असल्याने उपरोक्त 5 संवर्गाची परिक्षा राज्यात सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवाराला एकाच जिल्हा परिषदेमध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहून परिक्षा देता येणार आहे. तथापि 5 संवर्गाच्या पदभरती संदर्भात घेण्यात येणाऱ्या परिक्षेसाठीच्या प्रत्येक संवर्गाची प्रश्नपत्रिका सर्व जिल्हा परिषदांसाठी संवर्गनिहाय सामायिक राहणार आहे. त्यामुळे सन 2019 च्या जाहिरातीनुसार ज्या उमेदवाराने एक किंवा एकापेक्षा अधिक संवर्गांच्या परिक्षेसाठी एकापेक्षा अधिक जिल्हा परिषदेमधून अर्ज भरलेले आहेत त्या उमेदवारांचे सर्व ठिकाणी भरलेले अर्ज ग्राहय धरले जातील. अशा उमेदवारांबाबत त्याने प्रत्यक्ष एकाच जिल्हा परिषदे अंतर्गत आयोजित परिक्षेस उपस्थित राहुन परिक्षा दिल्यानंतर सदर परिक्षेमध्ये त्याला प्राप्त होणाऱ्या गुणांच्या आधारे त्याने ज्या ज्या जिल्हा परिषदेतून सदर पदभरतीसाठी अर्ज भरला आहे त्या त्या जिल्हा परिषदांच्या सदर पदांकरिताच्या तयार होणाऱ्या गुणवत्ता (प्रवर्गनिहाय) यादीमध्ये त्याचे नांव गुणवत्ता क्रमांकानुसार अंतर्भुत केले जाईल.

तसेच, नव्याने समाविष्ट झालेले दिव्यांग प्रवर्ग व खुल्या प्रवर्गात नव्याने वाढ झालेल्या रिक्त जागांसाठी प्रसिध्द होणाऱ्या जाहिरातीनुसार परिक्षेला बसु इच्छिणाऱ्या उमेदवाराला विभागाच्या दि. 23/07/2018 च्या शासन निर्णयानुसार एक किंवा एकापेक्षा अधिक जिल्हा परिषदांमध्ये पदांसाठी अर्ज करता येईल. तसेच एका उमेदवाराला एका किंवा अनेक संवर्गातील पदांसाठी अर्ज करण्याची मुभा राहिल. परंतु, प्रत्येक पदासाठी त्याला

स्वतंत्र परिक्षा शुल्क आकारले जाईल. तसेच, उमेदवाराने परिक्षेसाठी उपस्थित रहाण्याकरिता जिल्हा परिषदेचा विकल्प देणे आवश्यक आहे. याबाबत www.maharddzp.com या संकेतस्थळावर जाऊन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे उमेदवारास प्रवेशपत्र पाठविण्यात येईल. तसेच, सदर उमेदवारांबाबतही परिक्षा व गुणवत्ता यादीबाबतची कार्यपध्दती वरील परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे राहिल," असेवाचावे.

2. तसेच दिनांक 26/08/2021 रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरप्रकटन विवरणपत्र- "अ" मधील मुद्दा क्रं. 8 रद्द करण्यात येत आहे.

3. त्याच प्रमाणे दिनांक 26/08/2021 रोजी प्रसिध्द केलेले विवरणपत्र- "ब" नुसारच्या वेळापत्रकामधील अनु.क्रं. 02 मधून," एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमध्ये अर्ज सादर केलेल्या उमेदवारांकडून जिल्हयाचा विकल्प घेणे" ही बाब वगळण्यात येत आहे.

4.सदर शासन शुध्दीपत्रक संकेतस्थळ 1.www.zpnashik.maharashtra.gov.in
2.www.nrhm.maharashtra.gov.com
3. http://arogya.maharashtra.gov.in या सर्व संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

सही/-
**अध्यक्ष**
**जिल्हा निवड समिती**
**तथा**
**जिल्हाधिकारी,नाशिक**